**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-३/०९/२०११

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ०४ बुधवार दि.७/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- ७/०९/२०११ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ३६ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०३ गुरूवार दिनांक २५/८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ३७ | अर्जदार श्री. धर्माधिकारी एस.एन., रा. नगर-मनमाड रोड सावेडी बस स्थानका शेजारी वॉर्ड क्रमांक ४९ यांचे मिळकतीचे एका नळ जोडणीचे दोन बीलापैकी (मिटर प्रमाणे + वार्षिक पाणीपट्टी वसुली विभागाकडील) वसुली विभागाकडून जात असलेले सन २००४ ते २०१० अखेर रूपये ९,०००/- चे पाणीपट्टीचे बील क्रमांक ७९१ निर्लेखित करणेस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३८ | अर्जदार श्री.काशिनाथ तुकाराम खराडे, रा. निर्मलनगर सावेडी वॉर्ड क्रमांक ८१ यांचे एकाच मिळकतीचे दुबार नोंद झालेले सन २०१०-२०११ अखेर घरपट्टी रूपये १०,४१०/- चे बील क्रमांक ५५८ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक , टाचण , रजिस्टर , अ फॉर्म रिव्हीजन रजिस्टर इ. वर नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३९ | अर्जदार श्री. शेख मुनीर इस्माईल , रा. अभिलाषा कॉलनी, मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००५-२०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमाक ३७२ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.. |

| | |
|---|---|
| ४० | अर्जदार श्री. राम शंकर चौरे, रा. सोनेवाडी रोड, केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन १९९५ ते २०१० अखेर अखेर पाणीपट्टी वॉर्ड क्र. ३५ बील क्रमाक २५९ रूपये १२,९१८/- व बील क्रमांक २६० रूपये १३,३९८/-चे पाणीपट्टीचे दोन्ही बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.. |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता बाजू फी वसुली खाजगी तत्वावर करणेकामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता रक्कम रूपये २५ लाख निश्चित करणेस व रस्ता बाजू फी वसुली कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** १] विषय क्र. ३६- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०३ गुरूवार दिनांक २५/८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्र. ३७ ते ४१ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३६ बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ३६ बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०३ गुरूवार दिनांक २५/८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुरः-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०३ गुरूवार दिनांक २५/८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- मा.स्थायी समिती सदस्य श्री. किशोर डागवाले , श्री. गणेश भोसले व श्री.सुभाष लोंढे यांनी दिनांक ३/९/२०११ रोजी दिलेले पत्र सभेस वाचून दाखवावे.

स्थायी समिती क्लार्क :- श्री. किशोर डागवाले , श्री. गणेश भोसले व श्री. सुभाष लोंढे यांनी दिनांक ३/९/२०११ रोजी दिलेले पत्र सभेमध्ये वाचून दाखवितो.

महोदय,

स्थायी समितीने सन २०११-१२ च्या ठरावांबाबत जो निर्णय स्थायी समितीने घेतला त्या निर्णयाबाबत दररोज वृत्तापत्रामध्ये बातम्या येत असून, त्याबाबत आम्ही आपल्या निदर्शनास आणून इच्छितो की, ज्या वेळेस ठराव करतांना प्रशासनाने असा ठराव करता येतो, नाही येते हे सांगणे गरजेचे होते.

ज्या वेळेस मागील वर्षी ३ वेळेस जकातीचा ठेका देण्याचे पेपरमध्ये दिले तरी कोणीही ठेका भरला नाही. त्यावेळेस महापालिकेचे ६ कोटी रूपयाचे नुकसान झाले. त्यावेळेस कोणीही नगरसेवक , पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था का नाही बोलले ?

आम्ही प्रशासनाचे म्हणणे जर असा ठराव करता येत नसेल तर तुम्ही विषय परत स्थायी समिती समोर घ्या, आम्ही परत निर्णय नियमाप्रमाणे घेउ.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदरचे दिनांक २६/८/२०११ रोजीचे जकातीचे ठरावामध्ये दुरूस्ती करता येईल का ?

मा.उपायुक्त(सा.)श्री. डोईफोडे साहेब :- इतिवृत्त दुरूस्तीसह / दुरूस्ती विना कायम करता येउ शकते.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- १५ दिवसाचे मुदत देवुन जकात वसुला ठेका देणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग. पुं. / मा.श्री. लोंढे सु.सो. :- आपणास कमीत कमी किती मुदतीत निविदा मागविता येतील.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- जुन्या परिपत्रकानुसार तीन आठवडयाचे मुदतीने व नविन परित्रकाप्रमाणे एक महिन्याचे मुदतीने निविदा मागविता येतील.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापुर्वी कमीत कमी मुदतीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यांत याव्यात. याप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्रमांक३५ दिनांक २६/८/२०११ चे ठरावात दुरूस्ती करून दिनांक २६/८/२०११ चे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- मागील सभा क्र.१६/८/२०११ चे ठराव क्रमांक- १९ मध्ये सौ.बहार अंजूम वहाब सय्यद यांचे मुकुंदनगर येथील घरास नळ कनेक्शन नसतांना त्याना आकारलेली पाणीपट्टी रू.२०,२१२/- बील क्रमांक ३९६ व ३९७ चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी दिलेला आहे. परंतु सदर घर नं. सी-२ बील क्रमांक ३९७ पाणी पट्टी रूपये १२,५५४/- चे बील निर्लेखित करणेत यावे. याप्रमाणे स्थायी समिती सभा दिनांक १६/८/२०११चे इतिवृत्तामध्ये दुरूस्ती करून इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी. सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापुर्वी कमीत कमी मुदतीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यांत याव्यात. याप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्रमांक३५ दिनांक २६/८/२०११ चे ठरावात दुरूस्ती करून दि. २६/८/२०११ चे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मागील सभा दिनांक १६/८/२०११ व दिनांक २६/८/२०११ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करण्यांत यावे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/८/२०११ ठराव क्रमांक १९ मध्ये सौ. बहार अंजूम वहाब सय्यद घर क्र.सी-२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १२,५५४/- बील क्रमांक ३९७ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. याप्रमाणे दुरूस्तीसह व मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/८/२०११ ठराव क्रमांक ३५ मध्ये कमीत कमी मुदतीची जाहिर निविदा प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात याप्रमाणे दुरूस्तीसह सभा क्र.२ दिनांक १६/८/२०११ व सभा क्र.३ दिनांक २६/८/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती सभा दिनांक १६/८/२०११ ठराव क्रमांक १९ मध्ये पाणीपट्टी रूपये २०,२१२/- ऐवजी घर नं.सी-२ वॉर्ड क्र.८५ बील क्र.३९७ पाणीपट्टी रूपये १२,५५४/- निर्लेखित करण्यांस याप्रमाणे दुरूस्तीसह व मा.स्थायी समिती ठराव क्र.३५ दिनांक २६/८/२०११ चे ठरावामध्ये सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापुर्वी कमीत कमी मुदतीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून जकात वसुली ठेका देणेकामी जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात. याप्रमाणे दुरूस्तीसह मागील सभा दिनांक १६/८/२०११ व दिनांक २६/८/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्र.२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ ठराव क्रमांक १९ मध्ये "सौ. बहार अंजूम वहाब सय्यद घर नं.सी-२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणी पट्टी रूपये १२,५५४/- (रूपये बारा हजार पाचशे चौपन्न फक्त) वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ३९७ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. याप्रमाणे दुरूस्तीसह

तसेच मा.स्थायी समिती सभा क्र.३ शुक्रवार दिनांक २६/८/२०११ ठराव क्रमांक ३५ मध्ये दुरूस्ती करून अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणे कामी सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापुर्वी कमीत कमी मुदतीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून शासन परिपत्रकानुसार निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

याप्रमाणे दुरूस्तीसह मागील "मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०२ मंगळवार दिनांक १६/८/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०३ गुरूवार दिनांक २५/८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. दिलीप नानाभाउ सातपुते. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. किशोर आसाराम डागवाले. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३७ बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ३७ बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. धर्माधिकारी एस.एन., रा. नगर-मनमाड रोड सावेडी बस स्थानका शेजारी वॉर्ड क्रमांक ४९ यांचे मिळकतीचे एका नळ जोडणीचे दोन बीलापैकी (मिटर प्रमाणे + वार्षिक पाणीपट्टी वसुली विभागाकडील) वसुली विभागाकडून जात असलेले सन २००४ ते २०१० अखेर रूपये ९,०००/- चे पाणीपट्टीचे बील क्रमांक ७९१ निर्लेखित करणेस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. .

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-सावेडी हेडवसुली यांजकडुन अहवाल देण्यांत येतो की, सावेडी उप-कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वसुली वॉर्ड क्र.४९ मधील बिल क्र. ७९१ या ठिकाणी असलेले मिळकतदार श्री. धर्माधिकारी एस.एन., रा.- नगर-मनमाड रोड, सावेडी बसस्थानकाशेजारी यांनी दि.१३/१२/२०१० रोजी अर्ज देवुन नळकनेक्शनचे बिल रद्द करण्याबाबत कळविले आहे.

संबंधीत अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणी पुरवठा फिटर समवेत समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी मिळकतदार यांना महानगरपालिकेचे मिटर प्रमाणे आकारणी असुन प्रति वर्षी मिटर आकारणी नुसार पाणीपट्टी रक्कम अर्जदार मिटर प्रमाणे भरीत आहेत नळजोड एकच असुन त्याबाबतचा पाणीपुरवठा फिटर यांचा पाहणी अहवाल सोबत आहे परंतु एकच नळजोडाची मिटर प्रमाणे व वसुली विभागाकडुन रू. १५००/- प्रमाणे वर्षी पाणीपट्टी चालु आहे. संबंधीत अर्जदार यांनी दिलेला अर्ज तसेच मिटर प्रमाणे आकारणी होत असलेली पाणीपट्टी भरणा पावती पाहता व एकच नळजोड असुन दोन पाणीपट्टी चालू असल्याने अर्जदार यांच्या अर्जानुसार व दिलेल्या कागद पत्रानुसार वसुली विभागाकडील आकारणी होत असलेली पाणीपट्टी सन २००४ ते २०१० अखेर रू.९०००/- रद्द करणे बाबत अर्ज सादर केलेला आहे.

उपलब्ध व आवश्यक सर्व कागद पत्रांची पडताळणी करून व त्यानुसार रिपोर्ट तयार करून त्यावर पाणीपुरवठा फिटर यांचा रिपोर्ट मुख्य लेखा परिक्षक यांचा अहवाल तसेच मा.उपायुक्त यांची मान्यता घेवुन त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांची मान्यता घेवुन सदर पाणीपट्टी रद्द करण्या बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणे बाबत व त्याप्रमाणे संगणक व टाचन रजिस्टरला नोंद घेण्याबाबत मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी सावेडी प्रभाग समिती क्र.१ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. धर्माधिकारी यांचे घरास असलेल्या एक नळ कनेक्शनचे दोन बीला पैकी पाणीपट्टी रू.९०००/- बील क्र.७९१ चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- विषय क्रमांक ३७ ते ४० चे पाणीपट्टी बील, घरपट्टी बीलनिर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहेत. त्यांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे.

मा.श्री. भोसले गं.पु. :- प्रस्ताव क्रमांक ३७ ते ४० चे ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ३७ ते ४० चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अर्जदार श्री. धर्माधिकारी एस.एन., रा. नगर-मनमाड रोड सावेडी बस स्थानका शेजारी वॉर्ड क्रमांक ४९ यांचे मिळकतीचे एका नळ जोडणीचे दोन बीलापैकी (मिटर प्रमाणे + वार्षिक पाणीपट्टी वसुली विभागाकडील) वसुली विभागाकडून जात असलेले सन २००४ ते २०१० अखेर रूपये ९,०००/- (रूपये नऊ हजार फक्त)चे पाणीपट्टीचे बील क्रमांक ७९१ निर्लेखित करणेस व त्याप्रमाणे संगणक व टाचण रजिस्टरला नोंद घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३८ बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ३८ बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.काशिनाथ तुकाराम खराडे, रा. निर्मलनगर सावेडी वॉर्ड क्रमांक ८१ यांचे एकाच मिळकतीचे दुबार नोंद झालेले सन २०१०-२०११ अखेर घरपट्टी रूपये १०,४१०/- चे बील क्रमांक ५५८ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक , टाचण , रजिस्टर , अ फॉर्म रिव्हीजन रजिस्टर इ. वर नोंद घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**विषय-सावेडी हेडवसुली यांजकडुन अहवाल देण्यांत येतो की, सावेडी उप-कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वसुली वॉर्ड क्र.८१ या ठिकाणी असलेले मिळकतदार श्री.काशिनाथ तुकाराम खराडे, निर्मलनगर यांनी दिलेल्या दि.१६/११/२००९ रोजी अर्ज देवुन घरपट्टीचे ज्यादा दुबार नोंद झालेले बिल येत असल्याचे अर्ज सादर केला आहे.

संबंधीत अर्जदार यांच्या अर्जानुसार मालमत्ता हस्तांतरण प्रत म.न.पा. ची आकारणी नोटीस तसेच ७x१२ चा उतारा इंडेक्स नक्कल खरेदीखत बांधकाम मंजुरी व प्रांरभ प्रमाणपत्र बांधकाम नकाशा, मालमत्ता नोंदणी रजिस्टवरील नोंद इ. सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता संबंधीत मिळकतदार यांची एकच मिळकत असुन एकाच मिळकतीचे दुबार नोंद झाल्याने दुहेरी बिल जादा होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी उपलब्ध व आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यानुसार प्रस्ताव ठेवुन मा.मुलेप,आलेप,तसेच मा.उपायुक्त(कर) यांच्या मंजुरीने तसेच मा.आयुक्त साहेब यांच्या मंजुरीने दुबार झालेली घरपट्टी कराची रक्कम रूपये सन२०१०-२०११अखेर रू.१०,४१०/-मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९मधील कलम १५२नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करण्या बाबत व संगणक टाचण रजिष्टर,अ फॉर्म,रिव्हीजन रजिस्टर इ. वर नोंद घेण्याबाबत मान्यतेस्तव सादर येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी सावेडी प्रभाग समिती क्र.१ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठराव :-**अर्जदार श्री.काशिनाथ तुकाराम खराडे, रा. निर्मलनगर सावेडी वॉर्ड क्रमांक ८१ यांचे एकाच मिळकतीचे दुबार नोंद झालेले सन २०१०-२०११ अखेर घरपट्टी रूपये १०,४१०/- (रूपये दहा हजार चारशे दहा फक्त)चे बील क्रमांक ५५८ निर्लेखित करण्यांस व त्याप्रमाणे संगणक , टाचण , रजिस्टर , अ फॉर्म रिव्हीजन रजिस्टर इ. वर नोंद घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३९ बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ३९ बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अर्जदार श्री. शेख मुनीर इस्माईल, रा. अभिलाषा कॉलनी, मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००५-२०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमाक ३७२ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३(झेंडीगेट) दि.२/७/२०११

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्री. शेख मुनीर इस्माईल यांचा दि.२/२/२००९ रोजीचा अर्ज

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, श्री. शेख मुनीर इस्माईल यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केली की, माझे घर अभिलाषा कॉलनी भागात असुन घरपट्टी बीलामध्ये पाणीपट्टीची आकारणी केली आहे. परंतु आमच्या मिळकतीमध्ये नळ कनेक्शन नसल्याने सदरची पाणीपट्टी रद्द करावी. अशी विनंती केली आहे.

वास्तवीक परिस्थीत अशी की, वॉर्ड क्र.८८ बील क्र.३७२ वर श्री. शेख मुनीर इस्माईल यांची मिळकत आहे. त्यावर सन २००५ ते २०१२ अखेर घरपट्टी रू. ------ व पाणीपट्टी रू.१०,५००/- अशी नोटीस फिसह दोन्ही मिळुन रू. --------/- इतकी थकबाकी आहे. अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी नळकनेक्शन आहे किंवा नाही ? या बाबतचा अहवाल या प्रभागाकडील पाणीपुरवठा फिटर श्री. पाचारणे यांना अहवाल सादर करणे बाबत कळविले असता त्यांनी श्री. शेख मुनीर इस्माईल यांच्या मिळकतीची दि.१०/३/२०११ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही. अस्तीत्वात नाही या बाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवाल श्री. पाचारणे (पाणी पुरवठा फिटर) यांनी सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळकनेक्शन आढळुन आलेले नाही. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५/१ नुसार सन २००५-२०१२ पर्यत रू.१०५००/- इतकी चुकुन लागलेली पाणीपट्टी रद्द करणे संयुक्तीक वाटते तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली / मदतनीस प्रभाग समिती.क्र.३ यांचा अहवाल असे.

--**--

लिपीक :- सादर संबंधीत घर मालक यांचे येथे नळ नाही.

प्रभाग अधिकारी :- सादर, रिपोर्टास सहमत मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ अनुसार निलेखित होणेस्तव सादर.

मा. मुलेप. :- प्रस्तावीत अ प्रमाणे पाणीपट्टी रद्द करणे करिता मान्यतेसाठी सादर.

मा.उपायुक्त (कर):- निमयानुसार प्रस्तावीतनुसार पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबत मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- ॲजपर रिपोर्ट नुसार

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u> :-**अर्जदार श्री. शेख मुनीर इस्माईल, रा. अभिलाषा कॉलनी, मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००५-२०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- (रूपये दहा हजार पाचशे फक्त) चे वॉर्ड क्र.८८ बील क्रमाक ३७२ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४

विषय क्रमांक- ४० बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ४० बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. राम शंकर चौरे, रा. सोनेवाडी रोड, केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन १९९५ ते २०१०अखेर पाणीपट्टी वॉर्ड क्र. ३५ बील क्रमाक २५९ रूपये १२,९१८/- व बील क्रमांक २६० रूपये १३,३९८/-चे पाणीपट्टीचे दोन्ही बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. केडगाव विभाग जा.नं.५०४ दि.१८/१०/१०

विषय-कोणत्याही प्रकारचे नळ कनेक्शन संबंधीत मिळकत धारक यांनी कधीही घेतलेले नसतांना नजर चुकीने सन १९९५ पासून आकारलेली पाणीपट्टी रद्द होण्यास मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ :- (१) श्री. राम शंकर चौरे वॉर्ड नं.३५ बील नं.२५९ व २६० सोनेवाडी रोड केडगांव अ.नगर यांचा दि. २७/७/२०१० चा अर्ज.

(२) मा.श्री. भानुदास ए. कोतकर नगरसेवक यांचा दि.१८/९/२०१० चा अर्ज.

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. राम शंकर चौरे, वॉर्ड नं.३५ बिल नं.२५९ व २६० सोनेवाडी रोड लोंढे मळा केडगांव यांनी दि.२७/७/२०१० रोजी अर्ज देवुन कळविले आहे. की त्यांनी सदर ठिकाणी अदयापपर्यत नळकनेक्शन घेतलेले नसून त्यांना आकारण्यात आलेले पाणीपट्टीचे बिल सन १९९५ ते २०१० अखेर रद्द करून मिळावे असे त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे. तसेच मा.श्री. भानुदास ए. कोतकर (नगरसेवक) यांनी देखील दि.१८/९/२०१० रोजी लेखी अर्ज देवुन सदर जागेवर प्रत्यक्ष जावुन पहाणी करून नजर चुकीने नळ कनेक्शनची केलेली आकारणी रद्द करून बिल रद्द करणेबाबत मागणी केलेली आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील फिटर श्री. सातपुते यांनी प्रत्यक्ष पहाणी करण्यांस सांगितले असता त्यांनी प्रत्यक्ष जागेवर सदर ठिकाणी पहाणी केली असता वॉर्ड क्र.३५ बिल क्र.२५९ व २६० या दोन्ही प्रॉपर्टीवर नळ कनेक्शन आढळून येत नाही असा रिपोर्ट दिला आहे.

तसेच वसुली विभागाकडील दप्तरी पहाणी केली असता सन १९९५ ते २००३ अखेर पर्यत रेकॉर्डला पाणी पट्टी नोंद आढळून येत नाही. परंतु सन २००३-२०१० या आर्थिक वर्षातील टाचणवर नोंद आढळून येते.

तरी सदर ठिकाणी म.न.पा ने अदयापपर्यत नळकनेक्शन दिलेले नसल्याने नजर चुकीने त्यांना दिलेले सन १९९५ ते २०१० अखेरचे बील क्र.२५९ चे रू.१२,९१८/- , बील क्र.२६० चे रू.१३,३९८/-चे दोन्ही पाणीपट्टीचे बील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये कराधान-८-२०-१ (क-५) पोटनियम २ अन्वये निर्लेखित (रद्द ) करण्यास व तशी नोंद संगणक व रेकॉर्डला घेण्यास मंजूरी मिळण्यास्तव व तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे केडगाव उपकार्यालय मुख्य लिपिक यांचा अहवाल असे.

--**--

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.४ :- अहवाला प्रमाणे पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

मा.उपायुक्त(कर):- अ प्रमाणे प्रस्ताव मान्य परंतु चुकीची आकारणी केलेल्या लिपिकाचे नाव सादर करावे.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.४/ मुख्य लिपिक :- फेरसादर,वॉर्ड क्र.३५चे पाणीपट्टी वसुलीचे काम श्री. शरद वामन लगड (मदतनीस) हे पहात होते. सन १९९५ ते २००३ अखेर पाणीपट्टी रेकॉर्डची पाहणी केली असता सदर मिळकत धारकाकडे नळकनेक्शन नोंद नसल्याचे दिसून येत आहे.

परंतु सन २००३-२०१० अखेर पाणीपट्टी टाचणची रेकॉर्ड पहाणी केली असता सन २००३-२०१० अखेर नळकनेक्शनची नोंद असल्याचे दिसून येते.

सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये संपूर्ण केडगाव परिसराचा नळकनेक्शनचा सर्व्हे सेवा निवृत्त माजी सैनिक यांनी केला होता. त्यामध्ये सदर ठिकाणी नळकनेक्शन नसतानाही चुकीची नोंद केल्याने नळकनेक्शनची नोंद आढळून येते.

तरी सदरचा रिपोर्ट माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

मा.उपायुक्त साहेब :- नियुक्त केलेल्या समितीने पाहणी करून त्यांचे अहवालासह सादर करावे.

प्रभाग अधिकारी :- स्थळ पाहणी केली असता श्री. चौरे यांचे जुने पडके घर आढळून आले व एक बंगला जेथे ते रहात आहेत यांची स्वतंत्र बिले आहेत काय ? दोन्हीना नळ कनेक्शन नाही काय ? बिल क्र. २५९ व २६० चे अ परिशिष्ठ जोडावे.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.४/ मुख्य लिपिक :- मा. फेरसादर, सदर मिळकतीच्या ठिकाणी एक बंगला असून जुने पडके घर असल्याचे आढळून आले असून बंगल्याला कर आकारणी केलेली असून त्यांचे बिल नं. अनुक्रमे २५९ व २६० आहेत त्यांचे परिशिष्ट "अ" सोबत जोडले असून दोन्ही बिल नंबरला नळकनेक्शन दिले नसल्याबाबत पाणीपुरवठा विभागाकडील लिपिक व फीटरचा रिपोर्ट सोबत जोडलेला आहे. आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) :- बिल नं. २५९ व २६० हे अनुक्रमे श्री. राम चौरे व श्री. गोरख चौरे हया दोन सख्या भावांचे रो. हाउस जोडून आहेत व त्यांनी दोन्ही घरांचे सन १९९४ -९५ पासूनचे ग्रामपंचायतीचे घरपट्टी बिल सादर केले आहे.त्यात पाणीपट्टी आकारलेली नाही तसेच दि.६/८/२०११ रोजी समक्ष पाहणी केली असता तेथे विहिरीवर बोअर द्वारे पाणी उपसा करत असल्याचे आढळले व नळ कनेक्शन आढळले नाही.

तरी पाहणी अहवाल सोबत जोडलेला आहे. मा.स्थायी समिती पुढे अहवाल ठेवणेबाबत व पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि२/९/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u>**अर्जदार श्री. राम शंकर चौरे, रा. सोनेवाडी रोड, केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन १९९५ ते २०१० अखेर अखेर पाणीपट्टी वॉर्ड क्र. ३५ बील क्रमाक २५९ रूपये १२,९१८/-(रूपये बारा हजार नउशे आठरा फक्त) व बील क्रमांक २६० रूपये १३,३९८/- (रूपये तेरा हजार तीनशे अठ्याण्णव फकत )चे पाणीपट्टीचे दोन्ही बीले निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ४

विषय क्रमांक- ४१ बुधवार दिनांक ७/९/२०११

ठराव क्रमांक - ४१ बुधवार दिनांक ७/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता बाजू फी वसुली खाजगी तत्वावर करणेकामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता रक्कम रूपये २५ लाख निश्चित करणेस व रस्ता बाजू फी वसुली कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मार्केट विभाग दिनांक ८/८/२०११

विषय- रस्ता बाजु फी ची वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने देणे बाबत.

अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता बाजु फी वसुल करण्यात येते. सदरची वसुली मनपा कर्मचा-यांच्या मार्फत वसुल करण्यांत येते. कर्मचा-यांकडून रस्ता बाजू फी ची वसुली अपेक्षपेक्षा कमी होत असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता बाजू फी खाजगी तत्वावर वसुली करण्याबाबतचा धोर्णात्मक निर्णय घेवुन म.न.पा. क्षेत्रातील विक्रेत्यांचा सर्व्हे करण्यात आला त्यामध्ये १५७० विक्रेते असल्याचे आढळुन आले. त्यानुसार प्रत्येक विक्रेत्यांकडुन दररोज १०/ प्रमाणे प्रती दिन रू.१५७००/- याप्रमाणे वार्षिक रू.५७,३०,५००/- अशी रक्कम वसुल होणे अपेक्षीत आहे. त्यानुसार वर्षाला सरासरी रू.६० लाखाप्रमाणे रस्ता बाजु फी वसुलीचे उत्पन्न धरून मा. स्थायी समितीने ठराव क्र.११ दि.२८/०७/२००९ अन्वये निविदा पध्दतीने रस्ता बाजू फी वसुली करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार स्थानिक वृत्त पत्रामध्ये निविदा प्रसिध्द केली असता एकही निविदा फॉर्म ची विक्री झालेली नाही. असे चार वेळा स्थानिक वृत्त पत्रात प्रसिध्द देवुन त्यास कोणीही प्रतिसाद दिलेला नाही.त्यामुळे सदरचा विषय तसाच प्रलंबित होता. त्यावर सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकाच्या मंजुरीच्या वेळेस मा. स्थायी समिती पुढे सदरचा विषय चर्चेसाठी आल्यानंतर त्यामध्ये साधक बाधक चर्चा होवुन मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकातील प्रस्ताव क्र.९ मध्ये रूपये २५ लाख रस्ता बाजु फी वसुली करण्याबाबत प्रस्ताव मंजुर करण्यांत आला आहे.

तरी अंदाजपत्रकातील प्रस्तावानुसार सन २०११-१२ या वर्षाकरीता रू. २५ लाख या रक्कमेचे रस्ता बाजू फी वसुलीचे खाजगी तत्वावर देणे बाबत निविदा पध्दतीने देणेसाठी मान्यतेस्तव सादर. /**अ**

येणेप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

--**--

मा. मुख्य लेखा परिक्षक :- "अ" प्रमाणे मान्यतेस्तव

मा.उपायुक्त (कर) साहेब :- कृ. चर्चा, चर्चा झाली "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- अंदाजपत्रकात जरी २५ लक्ष तरतुद असली तरी त्याबाबत स्थायी समितीचा स्वतंत्र ठराव असणे आवश्यक आहे. प्रशासनाने ठरविलेली मुळ रक्कम, अंदाजपत्रकात झालेल्या दुरूस्तीसह मा.स्थायी समिती पुढे निर्णयार्थ ठेवा. दि.२/८/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता बाजु फी वसुली खाजगी तत्वावर करणेकामी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रूपये २५ लाख निश्चित करणेस व जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- रस्ता बाजु फी वसुली रूपये ६० लाख दाखविली होती. आता रू.२५ लाख धरले आहेत. ही रक्कम कमी कशी झाली.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- महानगरपालिकेच्या कर्मचा-यांकडून वार्षिक ८ ते ९ लाख वसुली होते आहे. तसेच चार वेळा निविदा मागवून ही साठ लाख निविदा रक्कम असल्याने निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ररत्यांचे कडेला बसणारे व्यावसायीकांचा सर्व्हे केला होता का ? रस्ता बाजु फी किती घेणेत येते.

मार्केट विभाग प्रमुख श्री. साबळे :- सन २००८ साली सर्व्हे केला होता तेव्हा एकूण विक्रेते १५७० होते. रस्ता बाजू फी म्हणून रूपये दहा घेणेत येतात.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ६० लाखांचे २५ लाख कसे झाले.

मार्केट विभाग प्रमुख श्री. साबळे :- मा.स्थायी समिती सभेने रस्ता बाजु फी वसुली रूपये ६० लाखा ऐवजी २५ लाख धरला होती. त्याप्रमाणे महासभेने त्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार रूपये २५ लाख रक्कम निश्चित केली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- रस्ता बाजु फी वसुली खाजगी तत्वावर करणे कामी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रूपये २५ लाख निश्चित करणेस व रस्ता बाजु फी वसुली कामी अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- रस्ता बाजु फी वसुली खाजगी तत्वावर करणेकामी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रूपये २५ लाख निश्चित करणेस व रस्ता बाजु फी वसुली कामी अभिकर्ता नेमणे करिता जाहिर निविदा मागविणेस, सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता बाजू फी वसुली खाजगी तत्वावर करणेकामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता रक्कम रूपये २५,००,०००/-(रूपये पंचवीस लाख फक्त) निश्चित करणेस व रस्ता बाजू फी वसुली कामी अभिकर्ता नेमणे करिता जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजू.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. किशोर आसाराम डागवाले. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका